सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: १५(२)(२२०)/१५३६/सात दिनांक- २९ सप्टेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय-ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र ग्रंथालय सेवा, गट-अ**

**संदर्भ-जाहिरात क्रमांक-००१/२०२१, दिनांक-२७ मे, २०२१**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र ग्रंथालय सेवा गट-अ (जाहिरात क्रमांक ००१/२०२१) या पदासाठी दिनांक २७ मे, २०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन विषयांकीत पदासाठी ज्या उमेदवारांनी आयोगास अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषगांने पात्रता तपासण्याकरीता खाली नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता – पदव्युत्तर पदवी | PDF | ५० | ५०० |
| ४ | शैक्षणिक अर्हता –ग्रंथालय शास्त्र विषयातील पदवी अथवा पदविका | PDF | ५० | ५०० |
| ५ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ७ | अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १० | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ११ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १२ | अराखीव महिला, अराखीव खेळाडू, अराखीव दिव्यांग, अराखीव माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १३ | नावात बदल झाल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १४ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १६ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १७ | महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांकरीता वयोमर्यादेतील सवलतीचे पुरावे/प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |

२. उपरोक्त प्रमाणपत्रे/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' (General Instructions) मधील प्रकरण क्रमांक-चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

३. अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-यांने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे (वित्तीय वर्ष २०२१-२०२२) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. 'लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन' व 'अनुभवाचा पुरावा' म्हणुन सादर करावयाचा नमूना आयोगाच्या संकेतस्थळावर 'DOWNLOADS' या सदरामधून उपलब्ध करुन घेण्यात यावा व त्यानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही नमुन्यात सादर केलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

५. उपरोक्त विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे PDF करुन विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत 'Certificates Upload' या मेनूमध्ये दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहिल.

ठिकाण- मुंबई

उप सचिव, सरळसेवा-१
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई